**महाराष्ट्र शासन**

सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१

Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

क्रमांक -ससं/उशि/पर्यावरण दिन वृक्ष लागवड/पुवि/२०२४/15988 दि. १०/०६/२०२४

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

२. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, पुणे विभाग,

३. प्राचार्य / प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित /कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, **पुणे विभाग.**

विषय - **जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन भारतीय वृक्षांची लागवड करुन वृक्षोत्सव पंधरवाडा साजरा करणेबाबत..**

संदर्भ - १. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षणृ वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. व्हि.आय.पी. /मुं./१४९२/२०२४ दि. ०५.०६.२०२४.
२. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/२०२४/संकीर्ण/मवि-१/३१०८ दि. ७ जून, २०२४.

उपरोक्त विषयी, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये, महाराष्ट्र शासन यांच्या संदर्भिय पत्राचे कृपया अवलोकन करावे.

मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये, महाराष्ट्र शासन यांचा वाढदिवस **दिनांक १० जून, २०२४** रोजी असून, त्यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरणपूरक कार्याची अपेक्षा व्यक्त करुन वृक्षोत्सव साजरा करण्याचे आवाहन, मा. मंत्री महोदय यांनी केले आहे. यानुषंगाने, पर्यावरणपूरक कार्य करुन वृक्षोत्सव साजरा करणे ही संकल्पना निश्चितच उत्तम पर्यावरण पूरक अशी असून यात सर्वच सहका-यांचे योगदान लाभावे व त्यांनी या कामी प्रत्यक्ष सहभाग नोंदवून त्यांचे सहकारी मित्र, आप्तेष्ट यांनादेखील या सत्कार्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे अशी मंत्री महोदयांनी इच्छा व्यक्त केली आहे.

तरी, पर्यावरणाचे समतोलाकरिता एक प्रयत्न करण्याच्या हेतूने तसेच मा. मंत्री महोदय यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षापूर्ती करण्याच्या हेतूने, संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये, शासकीय, अशासकीय अनुदानित महाविद्यालये व विना अनुदानित सर्व संस्था तसेच सर्व अकृषि विद्यापीठांच्या परिसरात व इतर ठिकाणी **दिनांक १० जून, २०२४ ते २४ जून, २०२४ या पंधरवाडयात** सोबत जोडलेल्या यादीमध्ये नमूद भारतीय वृक्षांची लागवड करुन वृक्षोत्सव साजरा करण्यात यावा.

**(डॉ.केशव तुपे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

सोबत - वरीलप्रमाणे.

# महाराष्ट्र शासन

## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

Website : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.. ०२०/२६१११९५३


क्र.उशिसं /२०२४/संकीर्ण/ मवि-१ | 3908 दिनांक-०७.०६.२०२४ 7 JUN 2024

**महत्त्वाचे/ कालमर्यादा**
**परिपत्रक :**

**विषय- जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन भारतीय वृक्षांची लागवड करून वृक्षोत्सव पंधरवाडा साजरा करणेबाबत.**
**(दि. १०.०६.२०२४ ते दि. २४.०६.२०२४)**

**संदर्भ-** मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. व्हि.आय. पी./ मु./१४९२/२०२४ दि. ०५.०६.२०२४

उपरोक्त विषयी, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये, महाराष्ट्र शासन यांच्या संदर्भीय पत्राचे कृपया अवलोकन करावे.

मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये, महाराष्ट्र शासन यांचा वाढदिवस दि. १० जून, २०२४ रोजी असून, त्यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरणपूरक कार्याची अपेक्षा व्यक्त करून वृक्षोत्सव साजरा करण्याचे आवाहन,मा. मंत्री महोदय यांनी केले आहे. यानुषंगाने, पर्यावरणपूरक कार्य करून वृक्षोत्सव साजरा करणे ही संकल्पना निश्चितच उत्तम पर्यावरण पूरक अशी असून यात सर्वच सहकाऱ्यांचे योगदान लाभावे व त्यांनी या कामी प्रत्यक्ष सहभाग नोंदवून त्यांचे सहकारी मित्र, आप्तेष्ट यांनादेखील या सत्कार्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे अशी मंत्री महोदयांनी इच्छा व्यक्त केली आहे.

तरी, पर्यावरणाचे समतोलाकरीता एक प्रयत्न करण्याच्या हेतूने तसेच मा. मंत्री महोदय यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षापूर्ती करण्याच्या हेतूने, संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये, शासकीय, अशासकीय अनुदानित महाविद्यालये व विनाअनुदानित सर्व संस्था तसेच सर्व अकृषि विद्यापीठांच्या परिसरात व इतर ठिकाणी **दि. १०.०६.२०२४ ते दि. २४.०६.२०२४** या पंधरवाडयात सोबत जोडलेल्या यादी मध्ये नमूद भारतीय वृक्षांची लागवड करून वृक्षोत्सव साजरा करण्याबाबत आपल्यास्तरावरून सर्व संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.

सोबत- वरील प्रमाणे.

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मंत्री
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग,
संसदीय कार्य

जा.क्र. मंत्री/उ.व तंत्र शि.,वस्त्रो.सं.कार्य/
व्ही.आय.पी./मुं./ 1492 / 2024

**चंद्रकांत (दादा) पाटील**

कार्यालय : ३०२, मंत्रालय (विस्तार) इमारत,
मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
✉ : cbpatil.minister@gmail.com
☎ + 91 22 2202 4751 / 2202 5398

०५ जून, २०२४.

प्रिय श्री. शैलेश देवळाणकर,

"जागतिक पर्यावरण दिनाच्या आपल्या सर्वांना शुभेच्छा..."

आज जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून मी आपल्याकडून काही पर्यावरणपूरक कार्याची अपेक्षा व्यक्त करीत आहे.

आपण सारेच जाणून आहोत की, गेली काही वर्ष राज्यात सातत्याने होणारी दुष्काळी परिस्थिती तसेच, अवकाळी पाऊस यामुळे अन्नदाता बळीराजा संकटग्रस्त झाला आहे. निसर्गाचा झालेला ऱ्हास व परिणामी वसुंधरेचा ढासळलेला समतोल यामुळे हे बिघडलेले निसर्गचक्र आता दुरुस्त करून या वसुंधरेला सुजलाम सुफलाम करणं हे आपल्या सर्वांचं आद्य कर्तव्य ठरतं. किंबहुना त्यातच साऱ्या विश्वाची प्रगती आहे.

दरवर्षी १० जून या माझ्या वाढदिवसानिमित्त माझ्या प्रियजनांकडून भेट स्वरूपात काही वस्तू स्वीकारण्याऐवजी मी काही ना काही नाविन्यपूर्ण अशा संकल्पना मांडून त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करीत असतो. गेली काही वर्ष ह्या निसर्ग चक्राविषयी आपण काहीतरी केलं पाहिजे हा विचार सतत माझ्या मनात घोंघावत आहे. देशी वाणाची वृक्ष लागवड अधिकाधिक करणे हा त्याला सर्वोत्तम उपाय आहे हे आपण सारेच जाणतो. माझ्या अनेक मित्रमंडळी व सहकाऱ्यांनी यंदाच्या माझ्या वाढदिवसानिमित्त मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्याचे सुचवले. ही संकल्पना निश्चितच उत्तम पर्यावरण पूरक अशी असून यात आपल्या सर्वच सहकाऱ्यांचे योगदान लाभावे व त्यांनी या कामी प्रत्यक्ष सहभाग नोंदवून त्यांचे सहकारी मित्र, आप्तेष्ट यांनादेखील या सत्कर्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे अशी माझी मनोमन ईच्छा आहे.

भारतीय वृक्षांच्या नावांची एक सूची माहितीसाठी या सोबत देत आहे. याचा सोयीनुसार उपयोग या संकल्पपूर्ती करीता अपल्या सर्वांना होईल.

आपण सारेच जण या संकल्पपूर्तीसाठी दिनांक १० जून २०२४ रोजी एकदिलाने वृक्षोत्सव साजरा करूया असे आवाहन आजच्या जागतिक पर्यावरण दिनी मी आपल्या सर्वांना करीत आहे.

C.B.Patil
(चंद्रकांत (दादा) पाटील)
मंत्री

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई.

प्रत:- १. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

## List of Indigenous Tree to be planted in Building and along Road side.

| Sr. | Name of Species | Botanical Name |
|---|---|---|
| 1. | wad | Ficus bengalensis |
| 2. | Krushnvad | Ficus krishnae |
| 3. | Pimpal | Ficus religiosa |
| 4. | Pimpran | Ficus tsiela |
| 5. | Umer | Ficus glomerata |
| 6. | kaduNeem | Azadirachta indica |
| 7. | Mahogani | Switenia mahigani |
| 8. | Mauva | Madhuca indica |
| 9. | Arjun | Terminalia arjun |
| 10. | Nagkeshar | Mesua ferrea |
| 11. | Khair | Acasia catechu |
| 12. | Tetu | Oroxylum indicum |
| 13. | Khirani | Manilkara hexandra |
| 14. | Putranjiva | Putranjiva roxburghi |
| 15. | Shivan | Gmelina arborea |
| 16. | Shami | Prosopis cinerania |
| 17. | Rudraksh | Elaeocarpus sphaericus |
| 18. | Sisam | Dalbbergia latifolia |
| 19. | Ritha | Speindus laurifollius |
| 20. | Fishtail Palm | Caryota urens |
| 21. | Hirda | Terminalia chebula |
| 22. | Beheda | Terminalia belerica |
| 23. | Bibba | Semecarpus anacardium |
| 24. | Bartondi | Morinda pubescens |
| 25. | Gorakhchinch | Adonsonia digitata |
| 26. | Apata | Bauhinia semla |
| 27. | Katesawar | Bomax ceiba |
| 28. | Coconut | Cocus nucifera |

| | | |
|---|---|---|
| 29. | Awla | Emblica officinallis |
| 30. | Chinch | Tamarandus indicum |
| 31. | Amba | Mangifera indica |
| 32. | kavat | Limonia aciddissima |
| 33. | jambhul | Syzygium cumini |
| 34. | Bor | Zizyphus mauritiana |
| 35. | Fanus | Arthocarpus heterophyllus |
| 36. | Sita Ashok | Saraca indica |
| 37. | Parkia | Parkia biglandulosa |
| 38. | Satvin | Alstonia scholaris |
| 39. | Bakul | Mimusops elangi |
| 40. | Bel | Angle marmelos |
| 41. | Taman | Lagerstromia speciosa |
| 42. | Champka | Magnolia sps |
| 43. | Palas | Butea monosperma |
| 44. | Kadamb | Anthocephalus indicus |
| 45. | Kanchan | Bauhinia purpurea |
| 46. | Bahava | Cassia fistula |
| 47. | Bakan Neem | Melia azedarch |
| 48. | Parijat | Nyclanthes arortistis |